निर्वाह भत्त्याचे पूर्नविलोकन करणे बाबत.
श्री.अनिल जयसिंगराव सानप सेवा निलंबीत शाखा
अभियंता जि.प.सा.बां. उपविभाग शेवगांव

अहिल्यानगर जिल्हा परिषद
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
आदेश क्रमांक ग्रापापु/आस्था-१/३६६ /२०२६
दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केल्याप्रमाणे

वाचा :- १. इकडील निलंबन आदेश ग्रापापु विभाग आस्था-१/४५०/२०२५ दि.०३/१२/२०२५
२. उप अभियंता जि.प.ग्रापपु वि.शेवगांव यांचे कडील पत्र क्र/जाक्र/आस्था/ १८८/२०२६ दिनांक १५.०५.२०२६
३. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १०/१२/१९८१
४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे हया काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ६८ (१)

श्री.अनिल जयसिंगराव सानप शाखा अभियंता जि.प.सा.बां. उपविभाग शेवगांव यांचेकडे ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग पाथर्डी येथील उप अभियंता पदाचा प्रभारी कार्यभार असतांना त्यांचे विरुध्द कार्यलयीन कामकाजा बाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याने व सकृतदर्शनी श्री.अनिल जयसिंगराव सानप शाखा अभियंता हे दोषी आढळून आल्याने संदर्भ क्रमांक -१ अन्वये त्यांना जिल्हा परिषद परिषद सेवेत सेवा निलंबित करण्यात आलेले आहे. श्री.अनिल जयसिंगराव सानप शाखा अभियंता यांचा सेवानिलंबन कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त झालेला आहे. श्री. सानप शाखा अभियंता यांचे विरुद्ध दोषारोप पत्र बजावणे प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.

श्री.अनिल जयसिंगराव सानप शाखा अभियंता हे त्यांचा सेवानिलंबन कालावधी वाढविल्यास जबाबदार नसल्याचे निष्पन्न होत असल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ -३ च्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री.अनिल जयसिंगराव सानप सेवा निलंबीत शाखा अभियंता यांना पहिल्या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्याच्या पन्नास टक्के इतक्या मर्यादेपर्यंत निर्वाह भत्ता वाढविण्यास मंजुरी देत आहे. तसेच संदर्भ क्रमांक १.अन्वये श्री.अनिल जयसिंगराव सानप सेवा निलबीत शाखा अभियंता यांना सेवानिलंबीत करण्यात आलेल्या आदेशामधील अटी व शर्तीची काटेकोर पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

सदर आदेशाची नोंद श्री.अनिल जयसिंगराव सानप सेवा निलबीत शाखा अभियंता यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202606221400017 असा आहे.

(आनंद भंडारी, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

Scanned with OKEN Scanner

**प्रति,**

श्री.अनिल जयसिंगराव सानप सेवा निलंबीत शाखा अभियंता

व्दारा :- उप अभियता जि.प.सां.बा.उपविभाग नेवासा.

२/- सदरचा आदेश श्री.अनिल जयसिंगराव सानप सेवा निलंबीत शाखा अभियंता यांना बजावणेत येऊन दिनांकित स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास विनांविलब सादर करणेत यावी.

**प्रत :-** उप अभियता जि.प.सां.बा.उपविभाग शेवगांव/नेवासा यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यकारी अभियंता सा.बां. दक्षिण/ उत्तर विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती शेवगांव/नेवासा .

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-06-2026 16:28:35

**(आनंद भंडारी, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

Scanned with OKEN Scanner